दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ५७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२१ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर धावत्या कारने अचानक घेतला पेट

**दै.रायगड नगरी । लोणावळा**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर धावत्या क्रूझ कारला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. ही कार पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात होती. मात्र कामशेत बोगद्याजवळ कारला अचानक आग लागली. सुदैवाने कारमधील तिघेही सुखरूप आहेत.

कामशेत बोगद्याजवळ दुपारच्या सुमारास ही घटना घडली. कारच्या इंजिनमधून धूर येत असल्याचं लक्षात येताच चालकाने कार थांबवली आणि खाली उतरून नेमकं काय होत आहे, याची पाहणी केली. कार पेट घेत असल्याचं चालकाच्या लक्षात येताच त्याने कारमध्ये असणाऱ्या इतर दोन व्यक्तींनाही बाहेर येण्यास सांगितलं.

काही वेळातच कारने पेट घेतला. या दुर्घटनेत कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे. चालकाने प्रसंगावधान दाखवल्याने सर्वांचे प्राण वाचले असून मोठा अनर्थ टळला आहे.

# तातडीने पंचनामे करून शासनास अहवाल सादर करावेत : ना.विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तौक्ते चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यात खूपच नुकसान झाल्याचे चित्र दिसत आहे. प्रशासनाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे व्यवस्थित करून शासनास तातडीने अहवाल सादर करावेत, असे निर्देश आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी जिल्हा प्रशासनाला आज येथे दिले. रायगड जिल्ह्यात झालेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याकरीता ते रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या बाबतची आढावा बैठक श्रीवर्धन येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी पालकमंत्री कु. आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, माजी आमदार माणिक जगताप, अतिरिक्त जिल्हाधिकारी अमोल यादव, प्रांताधिकारी अमित शेडगे, श्रीवर्धन तहसिलदार सचिन सूर्यवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड व इतर संबंधित विभागाचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री.वडेट्टीवार पुढे म्हणाले की, प्रशासनातील संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांनी जनतेच्या तक्रारींची नोंद घेऊन नुकसान झालेल्या प्रत्येक व्यक्तीला मदत मिळायलाच हवी, यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत. नुकसान न झालेल्या व्यक्तीला चुकूनही मदत दिली जाणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. कोणत्याही प्रकारे नागरिकांची तक्रार येता कामा नये. विशेषतः तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी यांनी आपले काम चोख करावे. शासन स्तरावरून आपत्ती व्यवस्थापन तसेच मदत पुनर्वसन च्या दृष्टीने अनेक आवश्यक त्या सुधारणा केल्या जाणार आहेत. राज्य शासनाकडून वीजप्रतिरोधकयंत्र बसविणे, भूमिगत वीजवाहिन्या टाकणे यासारखी कामे लवकरच सुरू होतील. याशिवाय पोल्ट्रीधारकांचाही प्रश्न येत्या काही दिवसात मार्गी लावला जाईल. हे शासन राज्यातील प्रत्येक गरजू व्यक्तीला त्याचा हक्क, सोयीसुविधा मिळवून देण्यास कटिबद्ध आहे,असे सांगून ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आजच्या या नुकसान पाहणी दौऱ्याचा सविस्तर वृत्तांत कळविला जाईल. मुख्यमंत्री महोदय स्वतः देखील पुढील चार दिवसात कोकणचा नुकसान पाहणी दौरा करणार असून हे शासन नुकसानग्रस्त नागरिकांना निश्चितच योग्य व आवश्यक ती मदत देईल, कोणावरही अन्याय होऊ देणार नाही, कोणीही गरजू नुकसानग्रस्त शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही.

या बैठकीत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांच्याकडे विनंती केली की, राज्य शासनाकडून रायगड जिल्ह्यातील नुकसानग्रस्तांसाठी भरीव मदत मिळावी आणि केंद्र शासनाकडेही भरीव मदत मिळविण्यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच चक्रीवादळामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, स्मशानभूमी यांच्या झालेल्या नुकसानीबाबत तातडीने मदत मिळावी.

दरम्यान आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिवसभरात पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्यासह माणगाव तालुक्यातील निजामपूर येथील केंद्रीय प्राथमिक शाळा, निजामपूर येथील केळीची बाग, तसेच म्हसळा तालुक्यातील चाफेवाडी आणि श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल कोळीवाडा येथे भेट देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. या पाहणीच्या वेळी जिल्हाधिकारी निधी चौधरी, तहसिलदार प्रियंका कांबळे यांची उपस्थिती होती.

पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी मदत व पुनर्वसन मंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांच्याकडे नुकसानग्रस्त नागरिकांच्या वतीने जोरदार बाजू मांडली. त्यांनी मागील वर्षी निसर्ग चक्रीवादळात झालेले नुकसान व शासनाने दिलेली भरीव मदत याबाबतची विस्तृत माहिती दिली. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर सहकारी मंत्र्यांनी केलेल्या मदतीचा आवर्जून उल्लेख करीत सर्वांचे आभार मानले. याचप्रमाणे पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या कोविड उपाययोजनाविषयी देखील मदत व पुनर्वसन मंत्र्यांना माहिती दिली.

## संक्षिप्त...

### दहावीची परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांचे नुकसान का करता? मुंबई हायकोर्ट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

'तुम्ही शिक्षणाचा खेळखंडोबा करताय का? करोनाच्या नावाखाली आपण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचे नुकसान करू शकत नाही. दहावीची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असेल तर ती कधी घेणार आहात? दहावीची रद्द करून तुम्ही बारावीची घेणार असल्याचे म्हणताय? हा काय गोंधळ आहे?', अशा शब्दांत मुंबई हायकोर्टाने दहावी परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाबाबत राज्य सरकारला खडे बोल सुनावले आहेत. दरम्यान, खंडपीठाने गुरुवारी सर्व प्रतिवादींच्या वकिलांना आपापले मुद्दे लेखी स्वरुपात मांडण्याचे निर्देश दिले आणि सुनावणी तहकूब केली.

करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची दहावीची परीक्षा रद्द केली आहे. या परीक्षा रद्द करण्याच्या निर्णया विरोधात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी याचिका दाखल केली आहे. त्यावर गुरुवारी मुंबई हायकोर्टात सुनावणी सुरू होती. त्यावेळी परीक्षा रद्द करण्याच्या मुद्द्यावरून न्यायालयाने राज्य सरकारची कानउघडणी केली.

दहावीची परीक्षा ही शालेय शिक्षणानंतर सर्वात महत्त्वाची असते. ती रद्द करून तुम्ही शिक्षणव्यवस्थेचे नुकसान करताय, न्यायमूर्ती शाहरुख काथावाला व न्यायमूर्ती सुरेंद्र तावडे यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला फटकारले. जवळपास १४ लाख विद्यार्थी असलेल्या बारावीची परीक्षा मे महिन्याच्या अखेर घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, मग जवळपास १६ लाख विद्यार्थी असलेल्या दहावीची परीक्षा रद्द का केली? असा भेदभाव का? असा सवाल खंडपीठाने राज्य सरकारला विचारला.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.


संपर्क : ९८२०३५५३४६

## श्री साई नारायणबाबा यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भगवती साई संस्थानचे संस्थापक आणि पनवेल येथील साई मंदिरचे निर्माणकर्ते जगद्गुरु बाल योगी श्री साई नारायण बाबा यांचे आज दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

नारायण भगवती अय्यर उर्फ श्री साई नारायण बाबा (८५) यांना त्यांच्या प्रकृती अस्वस्थामुळे कोपरखैरणे येथील रिलायन्स हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. परंतु आज दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. ही बातमी पनवेलमध्ये पसरताच साई भक्तांवर दुःखाचा डोंगर कोसळला. अनेकांनी फोन करून संबंधित संस्थेशी संपर्क साधून माहिती घेतली. विविध



सामाजिक उपक्रम, हजारो जणांचे मोफत विवाह, कोरोना काळात केलेले मोफत धान्य वाटप, विधवा माता भगिनींना केलेली मदत तसेच साई बाबांवर केलेले प्रवचन, अनेक निराधार गोरगरीबांना वेळोवेळी केलेली मदत यामुळे श्री साई नारायण बाबा पंचक्रोशीसह देशात, परदेशात प्रसिद्ध होते. देश-विदेशातून अनेक भक्त त्यांचे दर्शन, आशिर्वाद व प्रवचन ऐकण्यासाठी पनवेलमध्ये येत असत. गोरगरीबांसाठी त्यांनी अनेक सोहळे व कार्यक्रम राबविले होते. तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, डोळे तपासणी शिबीर आदी उपक्रम राबविले होते. गेल्या काही दिवसापासून त्यांच्या प्रकृती अस्वस्थामुळे ते घरातच होते. नुकतेच त्यांना कोपरखैरणे येथील रिलायन्स हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. परंतु आज दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली.

## हळदी समारंभातील धक्काबुक्कीचा राग मनात धरुन हवेत गोळीबार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हळदी कार्यक्रमात नाचत असताना त्याच्यात धक्काबुक्की झाल्याने त्याचा राग मनात धरुन एका इसमाला चौघा जणांनी धमकावून त्यांच्याकडील अग्नीशस्त्रातील दोन राऊंड हवेत फायर करून तसेच त्याच्या दिशेने एक राऊंड फायर करून चॉपरने त्यांना धमकाविल्याची घटना पनवेल जवळील छोटा खांदा गाव येथे घडली आहे.

फिर्यादी सुजित म्हात्रे (३१ रा.छोटा खांदा गाव) हा हळदी समारंभात नाचत असताना त्याला आरोपी प्रशांत भगत याची धक्काबुक्की झाल्याने त्याचा राग मनात धरुन त्याच्या इतर तीन साथीदारांनी मिळून सुजित म्हात्रे घरी जात असताना त्याला त्याच्या घराजवळ या चौघांनी जावून त्याला धमकावून त्यांच्याकडील अग्नीशस्त्रातील दोन राऊंड हवेत फायर करून तसेच त्याच्या दिशेने एक राऊंड फायर करून चॉपरने त्यांना धमकावून शिवीगाळ व दमदाटी करून ते निघून गेल्याने याबाबतची तक्रार त्याने कामोठे पोलीस ठाण्यात दिली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास परिमंडळ-२ चे पोलीस पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव करीत आहेत.

## रोह्यातील अंशुल कंपनीत वायूगळती; ३ कामगारांना बाधा



**दै.रायगड नगरी । रोहा**

धाटाव एमआयडीसी मधील अंशुल स्पेशालिटी मॉलिक्यूल लि. या कंपनीमध्ये बुधवारी वायूगळती होऊन तीन कामगारांना त्रास झाला होता. यापैकी दोन कामगारांवर रोह्यातील डॉ.जाधव हॉस्पिटल येथे उपचार सुरु असून, एका कामगाराला पुण्यातील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच आ.अनिकेत तटकरे यांनी कामगारांची विचारपूस करत बेजबाबदार कंपनी प्रशासनाला फैलावर घेतले.

या दुर्घटनेची माहिती मिळाल्यानंतर आ. अनिकेत तटकरे यांनी कंपनी प्रशासनाकडे संपर्क साधला. मात्र कंपनी प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही, ..../२

## पनवेल तहसील कार्यालयामार्फत तालुक्यातील अनाथ आश्रमांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील जवळपास १३ अनाथ आश्रमांना पनवेल तहसील कार्यालय यांच्याकडून कार्यतत्पर तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून मदतीचा हात देण्यात आला. कोरोनामुळे निर्माण झालेल्या कठीण परिस्थितीमध्ये या अनाथ आश्रमांना केलेल्या या मदतीमुळे मोठा आधार निर्माण झाला आहे.

पनवेल तालुक्यातील ''अनाथ आश्रमांचा आधार खुंटला'' अशा आशयाची बातमी समाज माध्यमांवर प्रसिद्ध झाल्यानंतर पनवेलचे कर्तव्यनिष्ठ तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील अनाथ आश्रमांचे सर्वेक्षण करून तसेच आश्रमात असलेल्या नागरिकांची संख्या लक्षात घेवून त्याप्रमाणे मदत करण्यात आली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दिड वर्षापासून निर्माण झालेल्या लॉकडाऊन सदृश्य परिस्थितीमुळे



गोरगरीब, मध्यमवर्गीयांचे जीवनमान कठीण झाले आहे. त्यासाठी अनेक सामाजिक संस्था, चॅरिटेबल ट्रस्ट, राजकीय पुढारी यांच्याकडून गोरगरीब व हातावर पोट असणाऱ्यांना मदतीचा ओघ सुरूच आहे. परंतु काही दिवसापूर्वी ''अनाथ आश्रमांचा आधार खुंटला'' या समाज माध्यमांवर पसरलेल्या बातमीच्या अनुषंगाने पनवेल तहसीलदार यांनी त्वरित दखल घेवून केलेल्या मदतीमुळे अनाथ आश्रमांना मोठा आधार मिळाला आहे. यामध्ये तालुक्यातील सील आश्रम लोणीवली, वरलेश्वर आधार घर व वृद्धाश्रम नेरे, स्नेहकुंज आधारगृह नेरे, शुभम वृद्धाश्रम नेरे, जनधर्म वृद्धाश्रम सांगटोली, आधार पुष्प सेवा सदर वाकडी, शांतीवन कुष्ठरोगी वाकडी, शांतीवन वृद्धाश्रम वाकडी, शांतीवन आधार घर वाकडी, शिवाश्रय आधार घर उसर्ली बुद्रुक, करुणेश्वर वृद्धाश्रम उमरोली, जनकल्याण सेवाश्रम कोळखे, परमशांतीधाम वृद्धाश्रम पेंधर यांना एकूण सुमारे १६२५ किलो तांदूळ, ३०० किलो तुरडाळ व १६२ लीटर खाद्यतेल उपलब्ध करून देण्यात आले.

## पनवेल शहरातील नळांना जलमापक बसविले जाणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली.

यावेळी पनवेल महानगरपालिका हद्दीतील पावसाळी तसेच आपत्कालीन परिस्थितीत नालेसफाई करणे हा विषय पटलावर मांडण्यात आला. यास महासभेने मंजूरी दिली. महापालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा विभागातील विद्युत पंप तसेच १८० केव्हीए जनरेटर सर्व्हिसिंग आणि दुरूस्ती करणे याविषयावर महासभेत चर्चा करून विषय मंजूर करण्यात आला.




पनवेल महानगरपालिकेच्यावतीने पनवेल रेल्वे स्थानकासमोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारणी करण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला. या प्रस्तावाचे नगरसेवकांनी स्वागत करून हा विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेच्या विविध विभागाकरिता आवश्यकतेनूसार कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यक छपाईसाठी जाहिर ई निविदा प्रसिध्द करून दर निश्चिती करण्याचा विषय महासभेत मांडण्यात आला. हा विषय महासभेने मंजूर केला. ..../२



**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक राजेंद्र पाटील यांच्या पाठपुराव्याने उलवे नोड सेक्टर १९ ॲपेक्स हॉस्पिटलमध्ये कोविड सेंटरचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मा.खा.रामशेठ ठाकूर, तहसीलदार विजय तळेकर, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, मा.नगराध्यक्ष संदीप पाटील, चेतन घरत आदी मान्यवर उपस्थित होते.**

# कोकणाचा आक्रोश ऐका

निसर्गानेच चिंचोळा भूगोल पदरात टाकलेला कोकणी माणूस चिवट आणि सहजासहजी हार न मानणारा आहे. कोणतेही संकट आले तरी त्यातून मार्ग काढण्याची उमेद कोकणी माणसामध्ये असते. मात्र, गेल्या वर्षीचे 'निसर्ग' चक्रीवादळ, तेव्हापासूनच सुरू असणारा करोनाचा कहर आणि तो संपण्याच्या आतच यंदा पुन्हा 'तौक्ते' या वादळाने दिलेला तडाखा यांनी पूर्ण कोकणाला पुरते नामोहरम करून टाकले आहे. गेल्या दोन दशकांत कोकणाने पर्यटन, आंब्यावर भर असणाऱ्या फळबागा आणि मच्छिमारी या तीनही क्षेत्रांमध्ये नवी भरारी घेतली होती. कोकणात येणाऱ्या महाकाय उद्योगांबाबत राजकीय पक्षांनी कितीही घोळ घातले तरी कोकणाने त्याकडे लक्ष न देता आपली वाटचाल चालू ठेवली होती. दुर्दैवाने, गेल्या दीड वर्षात या वाटचालीला चांगलीच खीळ बसली आहे. त्याहूनही खेदाची बाब म्हणजे, गेल्या वर्षीच्या निसर्ग चक्रीवादळानंतर ज्या कामांची आश्वासने राज्य सरकारने दिली होती, ती पुरी झालेली नाहीत. वादळे आली की, विजेचे खांब पडतात आणि वीजपुरवठा खंडित होतो, म्हणून आता कोकणात भूमिगतच वीजवाहिन्या टाकू, असे गेल्या वर्षी सांगण्यात आले. प्रत्यक्षात गेल्या वर्षभरात हे काम झालेले नाही. इतकेच नाही तर, निसर्ग चक्रीवादळानंतर झालेल्या पंचनाम्यांविषयीही शेकडो तक्रारी आहेत. त्या तक्रारींचे निराकरण अजूनही झालेले नाहीत. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील वादळी हानीची हवाई पाहणी केली. पंतप्रधानांचे तेच विमान जरा कोकणपट्टीवरून फिरवले असते तर काही बिघडले नसते. तडाखे देणाऱ्या निसर्गाला राज्यांच्या सीमा समजत नाहीत. मग आकाशमार्गी पाहणी करताना तरी त्या सीमा नेत्यांनी का मनात आणाव्यात? देवेंद्र फडणवीस आणि प्रवीण दरेकर हे दोन्ही सभागृहांमधील विरोधी पक्षनेते तीन दिवसांच्या दौऱ्यावर कोकणात गेले आहेत; मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेही वादळग्रस्तांना भेटण्यासाठी जाणार आहेत. इतरही मंत्री तसेच लोकप्रतिनिधी जातील. या साऱ्या नेत्यांच्या भेटीमुळे वातावरण निर्मिती होईल. घोषणांचा पूर येईल. प्रत्यक्षात कोकणाचे सारे आर्थिक, शैक्षणिक आणि एकंदरीत जनजीवन उद्ध्वस्त झाले आहे. या संकटाचा किंवा त्यातून काय नव्याने उभे करण्याची गरज आहे, याचा आवाका या नेत्यांना व सरकारला आला आहे का, हा आहे. कोकणात कोणत्या भागातील आंबे कधी येतात, याचे गणित असते. मे महिन्याच्या उत्तरार्धात निघणारे आंबे त्या वर्षीचा हंगाम संपत असताना बागवानांच्या हातात चार पैसे टाकतात. तो खऱ्या अर्थाने नफा असतो. यंदा या वादळाने संपूर्ण कोकणातला आंबा पडला आहे. त्यातला बरा शोधून प्रक्रियेसाठी पाठवणे, हेही खूप कष्टाचे आहे. याशिवाय, लागोपाठ दोन वर्षे हादरे बसल्याने नारळ, सुपारीसहित असंख्य बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. काही नेते हा अंदाज शंभराहून अधिक कोटींचा सांगत आहेत. तो फळबागांची सगळी हानी लक्षात घेतली तर याहूनही जास्त असू शकतो. राज्य सरकारच्या महसूली यंत्रणेने काही ठिकाणी पंचनाम्यांना सुरुवात केली आहे. मात्र, हे काम पारदर्शक आणि मुख्य म्हणजे शेतकरी व रहिवाशांना विश्वासात घेऊन झाले पाहिजे. तसे ते गेल्या वर्षी झालेले नाही. खरेतर, मुख्यमंत्र्यांनी कोकणाला आधार देण्यासाठी आता चार–पाच कार्यक्षम मंत्र्यांचा गट करून त्यांच्याकडे सारी सूत्रे सोपवायला हवीत. इतर हिशेब करण्याची ही वेळ नाही. अजित पवारांसारखा धडाडीचा मंत्री ही जबाबदारी निश्चितच पेलू शकतो. गेल्या वादळात प्रत्यक्ष पडल्या नाहीत पण कमकुवत झाल्या, अशा शेकडो शाळा या वादळाने उडवून दिल्या आहेत. सध्या त्या बंदच असल्या तरी त्या कधीतरी बांधाव्या लागतीलच. या साऱ्या कामांसाठी मुख्यतः अर्थ, महसूल, कृषी, शिक्षण, मदत आणि पुनर्वसन अशा साऱ्या खात्यांचा समन्वय होऊन वेगाने निर्णय व्हायला हवेत. कोकणाची एकीकडे अशी दुर्दशा होत असताना नौदलाने मोठा सागरी पराक्रम करून अनेक प्राण वाचविले, ही त्यातली समाधानाची बाब आहे. खवळलेला समुद्र, झंझावाती पाऊस, तुफान वारे, चौफेर अंधार या साऱ्यांची पर्वा न करता भारतीय नौदलाने हे बचावकार्य पार पाडले आहे. एकाच संकटात भारतीय सैन्यदले कसा प्रतिसाद देतात आणि त्याचवेळी सरकारी विभाग मात्र जबाबदाऱ्या एकमेकांकडे कशा ढकलत राहतात, हे पाहण्यासारखे असते. आजही कोकणातील संकटाचे निमित्त करून सर्व राजकीय पक्ष व नेते एकमेकांवर दुगाण्या झाडत बसले आहेत. या वर्तनातून आपण काय संदेश देतो आहोत, याचे भानही त्यांना उरलेले नाही. आज कोकणाचा हा आक्रोश पंतप्रधानांपासून राज्य सरकारपर्यंत आणि लोकप्रतिनिधींपासून नोकरशाहीपर्यंत सर्वांनी ऐकण्याची गरज आहे. सहनशील कोकणी माणसाचा करोना आणि दोन चक्रीवादळांनी अंत पाहिला आहे. आता केंद्र व राज्य सरकार व नोकरशाहीने त्याचा नव्याने छळ करू नये.

# धीरज सोनवणेने मिळवली अमेरिकेत मास्टर्स डिग्री

## प्रितम म्हात्रे यांनी केले पालकांचे अभिनंदन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर कोणतेही यश संपादित करता येते हे पनवेलमधील दिगंबर सोनवणे या रिक्षाचालकाच्या मुलाने सिद्ध केले आहे. धीरज सोनवणे असे या मुलाचे नाव असून, त्याने नुकतेच अमेरिकेच्या टेक्सस युनिव्हर्सिटीमधून इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनमध्ये मास्टर डिग्री संपादित केलीआहे. पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी त्याच्या आई वडिलांना पालिकेत बोलावून त्यांचे अभिनंदन केले आहे.

नवीन पनवेल सेक्टर ७ येथील रहिवासी दिगंबर सोनवणे यांचा मुलगा कु. धिरज दिगंबर सोनवणे यांने SMU University of Texas ( USA ) मधुन मास्टर इन टेलिकम्युनिकेशन मध्ये नुकतीच पदवी प्राप्त केली. १९९०मध्ये नाशिकहून पनवेल परिसरात स्थायिक झालेल्या दिगंबर सोनावणे यांनी काही वर्षे नोकरी करीत १९९५ साली पनवेल परिसरात प्रवासी रिक्षा चालविण्यास सुरुवात केली. त्यांनतर कुटुंबाचे उदरनिर्वाह व दोन मुलांचे शिक्षणासाठी दिगंबर यांनी अहोरात्र मेहनत घेतली असून, त्यांच्या या मेहन–तीचे फळ त्यांच्या मुलाने थेट अमेरिकेत मास्टर डिग्री संपादित केल्याने झाले आहे. हलाखीच्या परिस्थितीत दोन्ही मुलांचे शिक्षणासाठी हातभार लावणाऱ्या दिगंवर यांनी रिक्षा चालवली. मित्र,रिक्षा चालवत असताना ओळखीत रूपांतर झालेल्या प्रवासीमित्रांच्या मार्गदर्शनाने मुलांना शिक्षणात सहकार्य केले. शिक्षणाशिवाय दुसरे पर्याय नसल्याची बाब लक्षात घेत मुलांना जास्तीत जास्त शिक्षण देण्याचे मानस उराशी बाळगून दिगंबर यांचे स्वप्न आज त्यांच्या मुलाने पूर्ण केले आहे. मुलाच्या या यशाने दिगंबर यांचा आनंद द्विगुणित झाला आहे. मुलाच्या यशाने दिर्शबर यांचे पनवेल परिसरात कौतुक केले जात आहे. धीरज अमेरिकेतच नोकरी करणार असल्याचे दिगंबर यांनी सांगितले,

आजच्या कठीण परिस्थितीत सुद्धा रिक्षा आणि स्कूल व्हॅन चालवून सोनवणे यांनी आपल्या मुलाला अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी पाठवले. मुलाने अर्धवेळ काम करत आपल्या शिक्षणाचा अर्धा भार स्वतः उचलला. कु.धिरज सोनवणे यांनी युवकांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. कु.धिरज सोनवणे यांनी अमेरिकेत मास्टर इन टेलिकम्युनिकेशन मध्ये डीग्री प्राप्त केल्याबद्दल त्यांच्या आई वडिलांना पालिकेत बोलावून त्यांचे प्रितम जनार्दन म्हात्रे यानीअभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नैना क्षेत्रातील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांकरिता उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरविण्याचा सिडकोचा निर्णय

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नैना प्रकल्प क्षेत्रात शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांमध्ये, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरविण्याचा निर्णय सिडको महामंडळाकडून घेण्यात आला आहे. एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प विकसित करण्याकरिता किमान १८ मीटर रस्त्याची आणि प्रकल्प पुरस्कर्त्याने रस्त्यासह पायाभूत सुविधांचे संपादन करून विकसित करण्याची आवश्यकता असते. प्रकल्प पुरस्कर्ता (प्रोजेक्ट प्रपोनन्ट) हा आवश्यक अस–लेला प्रवेश रस्ता पुरविण्यास असमर्थ असून, त्यानेच नियोजन प्राधिकरणाकडे प्रवेश रस्त्याचे संपादन करण्याचा आग्रह धरला असल्याचे निर्दशनास आल्याने सदर निर्णय घेण्यात आला आहे.




नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राकरिता (नैना) सिडकोची १० जानेवारी २०१३ रोजी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली. सिडकोतर्फे तयार करण्यात आलेल्या नैना प्रकल्पाच्या विकास आराखड्याला १६ सप्टेंबर २०१९ रोजी राज्य शासनाकडून मंजुरी देण्यात आली. या आराखड्यामध्ये प्रामुख्याने विकास क्षेत्रे (निवासी आणि मिश्र वापर), निम्न विकास क्षेत्र, मनोरंजन क्षेत्र, औद्योगिक आणि वखार (वेअरहाउजिंग) क्षेत्र यांचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा विचार करता निम्न प्राथम्य क्षेत्रांमध्ये, अशा प्रकरणांमध्ये विशेष नियोजन प्राधिकरणाला हस्तक्षेप करणे आणि नियोजन प्राधिकरण किंवा शासनावर खर्चाचा भार न पडता, खासगी पुढाकारातून साकारण्यात येणाऱ्या, परवडणाऱ्या दरातील गृहप्रकल्पाकरिता प्रवेश रस्ता तयार करण्याकरिता जमिनीचे संपादन करणे आवश्यक आहे. त्यानुसार, जमीन संपादनाकरिता विकास आराखडा आणि एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पासह पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सिडकोने सुलभकाची (फॅसिलिटेटर) भूमिका पार पाडावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अंतर्गत हस्तांतरणीय विकास हक्क; संमती निवाडा; थेट वाटाघाटींद्वारे थेट खरेदी करून आर्थिक नुकसानभरपाई देणे आणि भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ नुसार आर्थिक नुकसानभरपाई देणे, अशा विविध मार्गांनी भूसंपादन करणे शक्य आहे. भूसंपादनाकरिता प्रकल्प पुरस्कर्त्याने, पुरस्कर्त्याला बंधनकारक असणारा करारनामा निष्पादित झाल्यानंतर सिडकोकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

भूसंपादनानंतर सर्व जमिनी या सिडकोकडे निहित राहतील आणि पुरस्कर्त्याकडून विनिर्दिष्ट तपशीलांनुसार आणि सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाच्या देखरेखीखाली प्रवेश रस्ता तयार करण्यात येईल. सिडकोकडून रस्ता तयार करून हवा असल्यास प्रकल्प पुरस्कर्त्याने सिडकोकडून निश्चित करण्यात आलेला खर्चाएवढी रक्कम जमा करावी व सदर रक्कम ही निविदा काढण्याच्या वेळी आगाऊ भरण्यात यावी, तसेच अंतिम निविदा मूल्यानुसार खर्चामधील वाढ किंवा घट ही वास्तविक तत्त्वावर आधारित असेल. याकरिता सिडकोतर्फे प्रकल्प पुरस्कर्त्याकडून १४% पर्यवेक्षण शुल्क आकारण्यात येईल. प्रकल्प पुरस्कर्त्याकडून १० वर्षे किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून ताबा घेतला जाईपर्यंत, रस्त्याची देखभाल करण्यात येईल.

> प्रकल्प पुरस्कर्त्यांनी असमर्थता दर्शविल्याने, नैना प्रकल्प क्षेत्रामध्ये एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांकरिता पायाभूत सुविधा विकसित करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाला चालना देऊन पायाभूत सुविधांकरिता होणार विलंब टाळण्यासाठी सिडको सुलभकाची भूमिका बजावणार आहे.
>
> **- डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# म्हसळा शिवसेनेच्या माध्यमातून ग्रामीण रुग्णालयास ऑक्सिजन मशीन भेट



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोरोनाचा वाढता प्रभाव आणि दिवसेंदिवस भासणारी ऑक्सिजन ची कमतरता लक्षात घेता म्हसळा तालुका शिवसेना संघटनेच्या माध्यमातून रोहा तालुका शिवसेना प्रमुख समिर शेडगे यांनी म्हसळा ग्रामिण रुग्णालयासाठी एक ऑक्सिजन मशीन भेट दिली. त्याचा लोकार्पण सोहळा म्हसळा तालुका माजी शिवसेना तालुका प्रमुख नंदू शिर्के, जि. प. चे माजी विरोधी पक्षनेते सुभाष करडे, शहर प्रमुख अनिकेत पानसरे, खारगाव सरपंच अनंत नाक्ती, सुरेश कुडेकर, कांतीशेठ जैन, गजानन शिंदे, अभय कळमकर, अक्रम साने, संतोष सुर्वे, अमित करंबे, डॉ. महेश मेथा, डॉ. अलंकार करंबे, डॉ. लोखंडे ग्रामिण रुग्णालयाचा कर्मचारी वर्ग आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के यांनी सांगितले कि खामगाव आणि वरवठणे ही सध्या कोरोनाची हॉटस्पॉट आ–हेत. अनेक नामवंत सामाजिक कार्यकर्त्यांना कोरोनामुळे आपले प्राण नाहक गमवावे ला–गले, परंतू आम्ही प्रयत्नांची पाराकाष्ट करून याच्यावर बऱ्याच प्रमाणात अंकुश ठेवला असून, येणाऱ्या रुग्णांना ऑक्सिजन ची कमतरता भासू नये रोहा शिवसेना तालुका प्रमुख समिर शेडगे यांच्या कडून नंदू शिर्के यांनी ऑक्सिजन मशीन भेट मिळवून ती ग्रामिण रुग्णालयास लोकार्पण केली.

यापुढे ग्रामिण रुग्णालयास लागणारी मदत आम्ही आमच्या परीने निश्चितपणे मिळवून देऊ असे आश्वासन नंदू शिर्के यांनी दिले. माजी विरोधी पक्षनेते सुभाष करडे यांनी ग्रामिण रुग्णालयातील सर्व डॉक्टर, सहकारी आणि कर्मचारी वर्गाचे कौतुक करताना सांगितले कि अतिशय कमी कर्मचारी वर्ग असताना कोरोना बाबतीत अतिशय उत्कृष्ठ अशी कामगिरी करून आपापली जबाबदारी उत्तमरित्या पार पाडली असल्याचे सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रोह्यातील अंशुल कंपनीत वायूगळती; ३ कामगारांना बाधा

म्हणून त्यांनी घटनास्थळी जाऊन कंपनीत भेट दिली. तेथील कंपनी प्रशासनाला याबाबत विचारणा केली असता, झालेल्या दुर्घटनेबाबत कंपनी प्रशासन गंभीर दिसले नाही. त्यानंतर आ.अनिकेत तटकरे यांनी रोहा येथील डॉ.जाधव यांच्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या कामगारांची चौकशी केली.

तेथे दोनच कामगार उपचार घेताना दिसले. तर तिसर्याभ कामगाराबद्दल विचारणा केली असता सदर कामगार अत्यवस्थ असल्याने त्यांना पुणे येथील रुबी हॉस्पिटलमध्ये हलविल्याचे समजले. विशेष म्हणजे ही बाब कंपनी प्रशासनाने पूर्णपणे लपवल्याचे समजले. आ. अनिकेत तटकरे यांनी कंपनी प्रशासनाला याबाबत विचारणा केली असता, त्यांनी आम्ही ही बाब सांगणारच होतो, असे सांगून सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

गतवर्षी याच कंपनीमध्ये अशा प्रकारची दुर्घटना होऊन ११ कामगारांना त्रास झाला होता. त्यावेळीही आमदार अनिकेत तटकरे यांनी हॉस्पिटलला भेट दिली होती. तेव्हाही कंपनी प्रशासनाने आम्ही योग्य ती खबरदारी घेऊन यापुढे अशी दुर्घटना पुन्हा होणार नाही, असे स्पष्ट केले होते. परंतु एक वर्षाचा कालावधी उलटत नाही तोच पुन्हा तशीच दुर्घटना होते आणि कंपनी प्रशासन यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करीत असेल, तर हा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशारा आ. अनिकेत तटकरे यांनी दिला.

एखादी मोठी दुर्घटना घडली तर कामगारांबरोबरच आजूबाजूच्या नागरिकांनी त्याचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कंपनी प्रशासनाच्या या निष्काळजीपणाकडे दुर्लक्ष करणे आणि अनेक कामगार, नागरिकांचा जीव टांगणीला ठेवणे असा होतो. हे कदापि सहन केले जाणार नाही. या दुर्घटनेची चौकशी केली जाणार आहे. जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणार्या कंपनी प्रशासनावर कठोर कारवाई करण्यासंदर्भात आपण पाठपुरावा करणार असल्याचे आमदार अनिकेत तटकरे यांनी स्पष्ट केले.

## पनवेल शहरातील नळांना जलमापक बसविले जाणार

महापालिकेच्या कार्यालयीन कामाजासाठी आवश्यक असणाऱ्या स्टेशनरी साहित्याची जाहिर ई– निविदेद्वारे दर निश्चित करण्याचा विषय महासभेसमोर मांडण्यात आला. या विषयास देखील महासभेने मंजूरी दिली. महानगरपालिका अंतर्गत पूर्वीच्या पनवेल नगरपरिषद क्षेत्रातील घरगुती तसेच बिगर घरगुती नळजोडण्यांवर जलमापक बसविण्याचा विषयावरती महासभेत चर्चा करून या विषयास मंजूरी देण्यात आली.

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांगर्तत प्रभाग समिती 'ब' येथील कालभैरव मंगल कार्यालयाच्या जागेत शहर उपजिवीका केंद्र स्थापन करण्याचा विषय महासभेच्या पटलावर मांडण्यात आला. याविषयावर चर्चा करण्यात आली. सदर जागे ऐवजी पर्यायी जागा शोधून हे केंद्र उभारले जावे असे काही नगरसेवकांचे मत आल्यामुळे हा विषय स्थगित ठेवण्यात आला. पनवेल महानगरपालिका नगरसेवक निधीअंतर्गत २०२१–२२, २०२२–२३ आणि २०२३–२४ च्या निविदा मंजूर होईपर्यंत कालावधीकरीता सार्वजनिक उद्यानांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी विविध उपकरणे ओपन जिम, डस्टबीन, बेंचेस इतर साहित्याचा पुरवठा करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळावी असा विषय महासभेसमोर मांडण्यात आला. या विषयावर महासभेत चर्चा झाली. या विषयास मान्यता देण्यात आली.

# रामदास आठवले यांनी केली पेण येथील नुकसानीची पाहणी

**दै.रायगड नगरी । पेण**

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील विनोबा भावे यांचे स्मारक असलेल्या गागोदे बुद्रुक या गावातील चक्रीवादामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला व पाहणी केली. यावेळी चक्रीवादामुळे मयत झालेल्या रामा बाबू कातकरी या इसमाच्या पत्नीची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. कोकणात वादळीवाऱ्यासह पाऊसही झाला. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली तर काही ठिकाणी झाडे उन्मळून पडलीत. तर काही ठिकाणी घरांवरील पत्रे आणि छप्परही उडाले.



चक्रीवादळामुळे झालेल्या विविध घटनांमध्ये अनेकांचा मृत्यू झाला तर शेकडो घरे उद्ध्वस्त झाली आहेत. पेण तालुक्यातील नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे सुरू असून लवकरच त्यांना सरकारने नुकसान भरपाई देण्याची गरज आहे. असे रामदास आठवले यांनी यावेळी सांगितले. यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष रीपाई (आठवले गट) जगदीश गायकवाड, पेण तहसीलदार अरुणा जाधव, प्रशासकीय अधिकारी आदी उपस्थित होते.

# मिरा बनसोडे यांची सहाय्यक पोलीस आयुक्तपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासनाच्या गृहविभागातर्फे जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार श्रीमती. मिरा तातोबा बनसोडे यांची सहाय्यक पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीमती.मिरा बनसोडे या नवी मुंबई पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होत्या. शासानातर्फे जारी करण्यात आलेल्या पदोन्नती यादीमध्ये त्यांना सहाय्यक पोलीस आयुक्तपदी बढती मिळाली असून त्या सहाय्यक पोलीस आयुक्त नवी मुंबई या ठिकाणी कार्यरत राहणार आहेत.

# बीज प्रक्रिया करूनच शेतकऱ्यांनी पेरणी करावी : शीतल ढाकणे

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

कृषी विभागामार्फत बीज प्रक्रिया मोहीम खरीप हंगामात राबविण्यात येत आहे.त्या साठी उरणच्या शेतकऱ्यांनी बीज प्रक्रिया करूनच पेरणी करण्याचे आवाहन चाणजे विभागातील कृषी सहाययक अधीकारी शीतल ढाकणे यांनी केले आहे.

बीज प्रक्रिया केल्यामुळे जमिनीतून आणि बियानाद्वारे पसरणारे रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी करून पिकांची वाढ होण्यासाठी बीज प्रकिया कमी खर्चामध्ये अत्यंत प्रभावी साधन आहे.तसेच बियाणे उववन क्षमता चाचणी ही शेतकऱ्यांनी पेरणी आधी करणे गरजेचे आहे. यावेळी चाणजे विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी शीतल ढाकणे ,परिवेक्षक ढवळ यांनी बीज प्रकिया भात उबवन क्षमता चाचणी तसेच दहा टक्के रासायनिक खत बचत या विषयी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले.तसेच कृषी विषयक इतर योजना महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत आबा नारळ फळबाग लागवडीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असेही आवाहन यावेळी कृषी सहायक अधिकारी शीतल ढाकणे यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## जगन्नाथराव कदम यांचे वृध्दापकाळाने निधन

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

पनवेल तालुक्यातील धरणाकँम्प गावातील भवानीनगरमधील रहिवाशी माजी सैनिक जगन्नाथराव कदम यांचे गुरूवारी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ९२ वर्षांचे होते. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेले जगन्नाथ कदम रायगड जिल्हा माजी सैनिक संघटनेचे अनेक वर्षे सचिव म्हणून काम पहात होते. त्यांच्या पश्चात पत्नी सुमित्रा कदम, चार मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे, पतवंडे आदी परिवार आहे.



जगन्नाथ कदम यांनी भारतीय सैन्य दलात २० वर्षे सेवा केली. सैन्य दलात भूषनावह कामगिरी केल्याबद्दल त्यांना अनेक शौर्यपदके देखील प्रदान करण्यात आलेली आहेत. नागालँडच्या सैनिकी कारवाईत त्यांना शौर्यपदक प्राप्त झाले होते. सैन्य दलाच्या सेवेनंतर भारतीय स्टेट बँकेत नोकरी केली. सेवानिवृत्तीनंतर सामाजिक कार्यासोबत माजी सैनिकांच्या संघटनेत काम केले. माजी सैनिकांना पेन्शन सुरू करण्यासाठी त्यांनी माजी सैनिकांची एकजुट करण्यापासून परिश्रम घेतले होते.

## किंजळघर येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील मौजे किंजळघर येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे किंजळघर ता.महाड येथील सर्व्हे नं.३८/० क्षेत्र ०५.३०.०० हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. इतके क्षेत्र, संबंधित ग्रामपंचायतीकडून पुर्नग्रहण करुन जमीन किंजळघर ता.महाड येथील नवीन आरोग्य उपकेंद्राकरिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

# १ हजार २०० हुन अधिक घरांचे अंशतः नुकसान, २०० हुन अधिक विजेचे पोल कोसळले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तौक्ते वादळाच्या तडाख्यामुळे पनवेल परिसराला मोठा फटका बसला. यात १ हजार हुन अधिक घरांचे अंशतः नुकसान झाले असून शेकडो झाडे उन्मळून पडली आहेत. यातील काही झाडे विजेच्या पोलवर पडली. या वादळात महावितरणचे २०० हुन अधिक विजेचे पोल खाली कोसळले.

शनिवार आणि रविवारी झालेल्या तौक्ते वादळामुळे पनवेल परिसरातील आणि तालुक्यातील वीज पुरवठा खंडित झाला होता. वादळी वारा आणि पावसामुळे पनवेल विभागातील जवळपास दोनशे खाली कोसळल्याची माहिती कार्यकारी अभियंता माणिक राठोड यांनी दिली. आणि ठिकाणी विजेच्या तारा कोसळल्या.

सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि तारा कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाला. याचा त्रास महावितरणच्या वीज ग्राहकांना सहन करावा लागला. अनेक



गावांमध्ये वीज गायब झाली होती तर काही ठिकाणी विजेचा लपंडाव सुरू होता. पनवेल, नवीन पनवेल तसेच आजूबाजूच्या काही गावांमध्ये महावितरणने अथक प्रयत्नानंतर वीजपुरवठा सुरळीत केला.

वादळी वाऱ्यामुळे पनवेलच्या ग्रामीण भागातील शेकडो झाडे पडली. यातील काही झाडे रस्त्यावर पडली होती. प्रशासन आणि नागरिकांच्या मदतीने ही झाडे बाजूला काढण्यात आली. पनवेल परिसरातील १ हजार २०० हुन अधिक घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. यात काही घरांचे पत्रे उडाली तर काही घरांची कौले फुटली आहेत. यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी दिली. नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे सुरू आहेत. पनवेलमध्ये तौक्ते वादळाचा जवळ जवळ १,२१२ घरांना फटका बसला असुन मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. या व्यतिरिक्त १८८ आंबा, भाजीपाला व इतरपिके घेणारे शेतकरी मोठ्या प्रमाणात बाधीत झाले आहेत.

> तालुक्यात आंबा पीक घेणारे क्षेत्र ५५१.९१ हेक्टर असुन यापैकी जवळ ४६.९२ हेक्टरवरील आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले आहेत. तालुक्यातील ५५ गावातील सुमारे १६९ शेतकरी या वादळाने बाधित झाले आहेत. महसूल विभागाने केलेल्या सर्वेक्षणात अंदाजे ४८ लाख रुपयांचे नुकसान या शेतकऱ्यांचे झालेले आहे. वादळाचा सर्वात जास्त फटका भाजीपाला पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना बसला आहे. तालुक्यात ५९९.४२ हेक्टरवर भाजीपाला पिकवला जातो. यापैकी ३.४० हेक्टरवरील भाजीपाला पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तालुक्यातील १६ शेतकऱ्यांचे यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हे नुकसान महसूल विभागाने केलेल्या सर्वे क्षणात सुमारे ३ लाख ७५ हजार एवढी आहे. इतर पिकांचे १.२० हेक्टर जागेवर नुकसान झाले असुन यामध्ये ३ शेतकरी बाधीत झाले.
>
> **विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल**

# जेएनपीटीतुन २५८.९५ मेट्रिक टन मेडिकल ग्रेड ऑक्सिजनचा साठ्याचे देशभरात वितरण

**दै.रायगड नगरी । उरण**

कोविड दरम्यान हजारो रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी अत्यावश्यक असलेला २८.७२ मेट्रिक टन मेडिकल ग्रेड ऑक्सिजन मंगळवारी जेएनपीटीत उतरविण्यात आला आहे.हा प्राणवायू संयुक्त अरब अमिरातीच्या जेबेल अलीमधुन आयात करण्यात आला आहे.

मागील १५ दिवसात एमव्ही जीएसएफ जिसली, एमव्ही नागोया टॉवर, एमव्ही बीएसएल लियास्सोल या तीन मालवाहू जहाजातून २५८.९५ मेट्रिक टन मेडिकल ग्रेड ऑक्सिजन जेएनपीटी बंदरात उतरविण्यात आले आहे.जलवाहिनीतील क्रॉजेनिक कंटेनरमध्ये भरलेल्या मेडिकल ग्रेड ऑक्सिजनची कोवीड रुग्णांच्या उपचारासाठी अत्यावश्यक बाब ठरत चालली आहे.मेडिकल ग्रेड ऑक्सिजन अभावी देशभरात शेकडो रुग्णांना प्राण गमवावे लागले आहे.

त्यामुळे बंदरात आयात करण्यात आलेल्या मेडिकल ग्रेड ऑक्सिजनचा साठा बंदरातुन तात्काळ इच्छित स्थळी पोहोचवण्यासाठी जेएनपीटीकडून विशेष प्रयत्न




केले जात आहेत. देशभरातील कोविड रुग्णांसाठी संयुक्त अरब अमिरातीमधुन मागील १५ दिवसात २५८.९५ मेट्रिक टन मेडिकल ग्रेड ऑक्सिजनचा साठा उतरविण्यात आला असल्याची माहिती जेएनपीटीच्या अधिकृत सुत्रांनी दिली आहे.

# युवा कवयित्री वर्षा शिदोरे लिखित 'स्मितरहस्य' काव्यसंग्रहास पुरस्कार

**दै.रायगड नगरी । रोहा**

साहित्य क्षेत्रात आपली एक आगळी वेळगी ओळख निर्माण करणाऱ्या नाशिक येथील युवा कवयित्री वर्षा शिदोरे यांचा 'स्मितरहस्य' हा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित करण्यात आला आहे. त्यांच्या या काव्यसंग्रहास महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील साहित्यिक व वाचक वर्गांनी हा काव्यसंग्रह वाचून त्याचे छानसे अभिप्रायही पाठविले आहेत.

नुकताच या काव्यसंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व्यक्त होताना दिसत आहे.कवी चंद्रकांत जोगदंड यांच्या काव्यार्चना कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त कै गंगाधर श्रावण आबक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या 'स्मितरहस्य' काव्यसंग्रहास विशेष सन्मान देण्यात आला असून सन्मान पत्र व स्मृतिचिन्ह हे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुढील काही महिन्यांत एका कार्यक्रमदरम्यान मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे प्रदान करण्यात येईल अशी माहिती कवी चंद्रकांत जोगदंड यांनी दिली आहे.

कवयित्री कु. वर्षा बाबासाहेब शिदोरे या उंटवाडी, नाशिक येथील असून वर्तमानपत्रे, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, स्टोरी मिरर तसेच इतर समाजमाध्यमांवर त्यांचे लेखन (लेख, कथा, कविता इत्यादी) प्रदर्शित आहे. वयाच्या २४व्या वर्षी लिहिलेला पहिला कविता संग्रह 'स्मितरहस्य' २८ सप्टेंबर २०१९ मध्ये प्रकाशित करण्यात आ-लेला आहे.

# आदई येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पनवेल तालुक्यातील मौजे आदई येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे आदई ता.पनवेल येथील स.नं.१७/२ क्षेत्र ०.११.०० हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. या गुर-चरण जमिनीचे शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,रायगड-अलिबाग यांच्याकडे मौजे आदई ता.पनवेल येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राकरिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.


# तौक्तेने जिल्ह्यातील आंबा बागायतदार हतबल; करोडो रुपयांवरून फिरले पाणी

## १५५० हेक्टरवरील आंब्याचे नुकसान

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

जिल्ह्यात नुकत्याच धडकलेल्या तौक्ते चक्रीवादळाने आंबा बागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. ऐन काढणीला आलेला आंबा जमीनदोस्त झाला आहे. तर काही पावसाने खराब झाला. परिणामी बागायतदरांचे करोडोंचे नुकसान झाल्याची शक्यता आहे. प्राथमिक पाहणीनंतर तब्बल १५५० हेक्टरवरील आंब्याच्या नुकसानीची शक्यता झाली असल्याची माहिती जिल्हा कृषी कार्यालयाने दिली आहे.

मागीलवर्षी निसर्ग चक्रीवादळामुळे आंब्याची झाडे उन्मळून पडली. त्यानंतर खराब हवामान, परतीच्या व अवकाळी पावासामुळे शिल्लक असलेल्या झाडांना जेमतेम ५० टक्के फळधारणा झाली. आणि



आता त्योक्ते वादळाने हे उत्पादन देखील हिरावून नेले असल्याने जिल्ह्यातील बागायतदार पुरते हतबल झाले आहेत.

जिल्ह्यात साधारणतः १४ ते १५ हजार हेक्टर आंब्याचे क्षेत्र आहे. हेक्टरी एक ते दीड टन आंब्याचे उत्पादन येते. योग्य मशागत, खबरदारी व काळजी घेतल्यास आणि हवामानाने चांगली साथ दिल्यास आंबा बागायतदारांच्या हाती चांगले उत्पादन लागते. साधारण १५ मे पासून अगदी जूनच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत जिल्ह्यातील आंब्याची काढणी केली जाते.

हा आंबा स्थानिक बाजारपेठेत विकून व त्याची निर्यात करून त्यांना चांगला पैसे देखील मिळतो. मात्र मागील वर्षी लॉकडाऊनमूळे आंब्याची विक्री फारशी झाली नाही. व निसर्ग चक्रीवादळाचा फाटक बसला. त्यानंतर यंदा तौक्ते वाद-ळाने नुकसान केले. अशा प्रकारे सलग २ हंगाम नुकसानीचा फटका या आंबा बागायतदारांना बसला आहे.

# सुक्या मच्छीला खवय्यांची अधिक पसंती ; अघोटीसाठी महिला वर्ग लागले तयारीला

**दै.रायगड नगरी । तळा**

सध्या कोरोना महामारीचाउपद्रव मोठ्या प्रमाणावर होत असल्याने देशात सर्वत्र खरेदी विक्री वर बंदी घालण्यात आली आहे. सकाळी ७ते११ या वेळेतच दुकाने उघडी आसुन खरेदी विक्री करताना गर्दी होऊ नये म्हणून बंधने घातली गेली आहेत.

महिला वर्गाला मात्र अघोटीचे पावसाळ्यासाठी साठवणूक करण्यात गुतंले असुन पापड, मसाले, गहू, तांदूळ, कडधान्ये बरोबर मांसाहारी वर्ग सुकी मच्छी भरण्यासाठी सुकी मच्छी दुकानात गर्दी केली जात आहे. संचारबंदी लगत लाँकडाऊन असल्याने दळणवळणाची साधने उपलब्ध नाहीत. तरी देखील खाजगी वाहनातून बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी होतआहे. ग्रामीण भागात पावसाळ्यासाठी सुकी मच्छी साठवणूक मोठ्या प्रमाणावर केली जाते. ओली मच्छीला बंदी असते व प्रजनन काळ असल्याने मच्छी मिळत नसल्याने ग्रामीण भागातील मांसाहारी वर्ग सुक्या मच्छीला अधिक पसंती दिली जाते.



सुकट, मांदेली, बारीक जवळा, अंबाडी सुकट, वाकटी सफेद, वाकटी काळी, माकली, ढोमकी, बोंबील, बांगडा याची मागणी वाढली असून माल मिळत नसल्याने किरकोळ व्यापारी अडचणी सापडला आहे. घाऊक व्यापारी चढ्या विक्री करीत आहेत. अंबाडी सुकट ४००-५०० बारीक सुकट १५०-२०० बोंबील ३००-५०० सोडे १५००-१७०० बगी ३००-५०० मांदेली २००/-असे प्रति किलो दर असून आवक वाढली आहे. मागील वर्षापेक्षा भाव वाढले असले तरी खवय्ये मात्र आपली तजवीज करताना दिसत आहेत.

# म्युकरमाकोसीस

म्युकरमाकोसीस हा बुरशी मुळे होणारे इन्फेक्शन आहे. म्युकर या बुरशीचे स्पोर हवेत, मातीत, धुळीत आढळतात.

म्युकर स्पोर हे कॉमनसेल असल्यामुळे आपल्या नाक, तोंड ,दात व घशात नेहमीच असतात. परंतू आपली रोगप्रतिकारशक्ती चांगली असल्यामुळे शक्यतो म्युकरमायकोसीस होत नाही. ज्या व्यक्तींची रोगप्रतिकारशक्ती , काही कारणास्तव वा आजारामुळे कमी झाली आहे , अशांना म्यकरमाकोसीस होऊ शकतो.

सद्ध्या कोव्हीड ची दुसरी लाट ही कोरोना विषाणूंच्या म्युटंट स्ट्रेन मुळे आली असून ,हा विषाणू शरी-रातील पेशींना नष्ट करतो. कोव्हीड झालेले मधुमेही रुग्ण व कोव्हीड नंतर ज्या रुग्णांची ब्लड शुगर वाढली आहे, अशांमध्ये म्युकरमायकोसीसचा प्रादुर्भाव दिसून आला आहे .

म्युकरमायकोसीसची लागण , नाक- सायनसला होऊन, प्रसार डोळा , मेंदूपर्यंत झपाट्याने होतो. खालील प्रमाणे याची लक्षणे दिसून येतात. नाक - नाक बंद होणे , श्वास घ्यायला त्रास होणे, नाकातून रक्तस्त्राव होणे. डोळा - दुखणे , सुजणे , लाल होणे , द्रुष्टी जाणे, डोळ्याची हालचाल न होणे (Frozen eye), इतर - अर्ध डोकं दुखणे, चेहर्याची अर्धी बाजू दुखणे, फिट येणे, थकवा येणे. म्युकरमायकोसीस वरील उपचार हा किचकट पण त्वरित, डॉक्टरांच्या टीमद्वारे करणे आवश्यक आहे. या टीममध्ये नाक कान घसा तज्ञ, नेत्रतज्ज्ञ व न्युरालाजीस्ट असतात.

म्युकरमायकोसीस कसा टाळू शकतो? १. मधुमेह व मधुमेह नसलेल्या पण कोव्हीड झालेल्या रूग्णांनी ब्लड शुगर काटेकोरपणे नियंत्रित ठेवणे. २. वर दिलेल्या पैकी कुठलेही लक्षण वा लक्षणे आढळल्यास त्वरित संबंधित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ३. म्युकरमायकोसीस टाळण्यासाठी कुठलीही गोळी किंवा औषधं नसून , स्वच्छता ठेवणे ,हाच एक उपाय आहे. ४. दिवसातून २ - ३ वेळा स्वच्छ पाण्यानी , चेहरा-नाक- तोंड स्वच्छ धुणे. ५. शक्यतो मधुमेही व्यक्तींना कोव्हीड होऊ न देणे . त्यासाठी मास्कचा वापर ,सोशल डिसटंशींग पाळणे, सार्वजनिक ठिकाणं टाळणे. ६. म्युकरमायकोसीस हा संसर्गजन्य आजार नसल्यामुळे इतरांनी घाबरून जाऊ नये. ७.नाक व कान कोरणे, तसेच डोळे चोळणे कटाक्षाने टाळावे.

**डॉ. संदीप इंगळे**
**नेत्रतज्ज्ञ**
**पनवेल**

# पोलादपूर येथील एस.टी.स्थानक बनलेय 'एलॲण्डटी' च्या डम्परसह रिक्षेचेही वाहनतळ



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील शेवटचे एस.टी.बस स्थानक असलेल्या पोलादपूर स्थानकामध्ये सध्या एस.टी.महामंडळाची प्रवासी वाहतूक बंद असल्याने 'एलॲण्डटी'च्या डम्पर्ससह अन्य वाहने व रिक्षेचेही वाहनतळ बनले आहे. एस.टी.महामंडळाच्या वा-हतूक नियंत्रण कक्षाला या अवैध पागिविरोधात मवाळ धोरण ठेवावे लागत आहे.

पोलादपूर येथील एस.टी.बसस्थानक हे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील शेवटचे एस.टी.बसस्थानक असून महाड एस.टी. आगारांतर्गत या स्थानकाचे नियंत्रण आहे. कोरोना लॉकडाऊन काळात गेल्या महिन्यापासून एस.टी.बसेसमधून प्रवासी वाहतूक बंद झाल्यामुळे स्थानकाचे आ-वार संपूर्ण रिकामे असल्याची संधी साधून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा ठेका घेतलेल्या 'एलॲण्डटी' कंपनीच्या कामावरील डम्पर्ससह रिक्षा तसेच अन्य वाहने उभी करून ठेवण्यात आली आहेत. यामुळे एस.टी.बसेस वगळता अन्य वाहनांसाठीचे वाहनतळ असे या स्थानकाने स्वरूप धारण केले आहे.

एरव्ही प्रवाशांना सोडण्यास येणाऱ्या नातेवाईकांच्या वाहनांना स्थानकामध्ये प्रवेश बंद ठेवणाऱ्या एस.टी.महामंडळाच्या वाहतूक नियंत्रकांनी या परिस्थितीकडे सपशेल डोळेझाक सुरू केल्याने रिक्षा स्टॅण्डमधील रिक्षा तसेच 'एलॲण्डटी' कंपनीच्या कामावरील डम्पर्ससह अन्य वाहने या स्थानकाम ध्ये दिवसरात्र पागिसाठी उभी केली जात आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या जमीन मिळकतीचे मालक यांनी सदर मिळकत आमचे अशिलांस विकणेसंदर्भात त्यांचे बरोबर वाटाघाटी केलेल्या आहेत. तरी खाली नमूद केलेल्या मिळकती संदर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, लिएन, चार्जेस, अटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, संपादन, रेक्वीझेशन, अगर अन्य प्रकारचा कसलाही, कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत खालील सह्या करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरुन व मागाहून आलेल्या हरकती जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकती खरेदी करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : वांद्रोशी, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड**

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | भोगवटादाराचे नाव | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १/२ | ०-०४-०० | श्री.रुपेश लहू साळुंखे | ०.०३ |

सही/-
**ॲड.किरण सदानंद घरत**
**शॉप नं.१, हेमकुंज बिल्डींग,**
**प्लॉट नंबर २२, सेक्टर ८,**
**खांदा कॉलनी, नवीन पनवेल**
**मोबा नं.९९८७३७९६९५**

# संक्षिप्त...

## दुकानाचे शटर उचकटून ३ लाख ७० हजार रुपयाच्या मालाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बंद दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी ३ लाख ७० हजार ४९२ रुपये किंमतीच्या इलेक्ट्रॉनिक साहित्याची चोरी केल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात घडली आहे.

सुलतानराम पेमाराम देवासी यांचे तळोजा औद्योगिक वसाहत बेलनाका येथे स्वस्तिक इलेक्ट्रॉनिक या नावाने दुकान असून, सदर दुकान बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने मुख्य दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश करून जवळपास ३ लाख ७० हजार ४९२ रुपयाच्या इलेक्ट्रॉनिक साहित्याची चोरी केल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गोंडाळे येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील मौजे गोंडाळे येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे गोंडाळे ता.महाड येथील सर्व्हे नं.१८३/२ एकूण क्षेत्र ००.५७.०० हे.आर.पैकी ०-०३-० हे.आर. इतके क्षेत्र, ग्रुप ग्रामपंचायत गोंडाळे यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन मुक्त व सारामाफीने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,रायगड-अलिबाग यांच्याकडे मौजे गोंडाळे ता.महाड येथील नवीन आरोग्य उपकेंद्राकरिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

## देवकान्हे येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रोहा तालुक्यातील मौजे देवकान्हे येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे देवकान्हे ता.रोहा येथील गट नं.२७०, एकूण क्षेत्र ०.२५.० हे.आर. इतके क्षेत्र, ग्रुप ग्रामपंचायत चिल्हे/देवकान्हे यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन मिळकती भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जाहक्काने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,रायगड-अलिबाग यांच्याकडे मौजे देवकान्हे ता.रोहा येथील नवीन आरोग्य उपकेंद्राकरिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

# चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस पोलादपूरमध्ये

## माजी पालकमंत्री आ.रवींद्र चव्हाणही उपस्थित-विरोधीपक्ष नेत्यांची अचानक संयुक्त भेट

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोणताही पूर्वनियोजित दौरा नसताना बुधवारी रात्री विधानसभेचे विरोधीपक्षनेते माजी मुख्यमंत्री आ.देवेंद्र फडणवीस आणि विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते आ.प्रवीण दरेकर यांनी रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आ.रवींद्र चव्हाण यांच्यासह गुरूवारी सकाळी तोऊत्तेफ चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर विश्रामगृहामध्ये सरकारी अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर मार्गस्थ झाले. यावेळी दोन्ही विरोधीपक्षनेत्यांसमवेत रायगडचे माजी पालकमंत्री व आ. रवींद्र चव्हाण हेदेखील उपस्थित होते.



पोलादपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहामध्ये सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास माजी मुख्यमंत्री व विधानसभेचे विरोधीपक्षनेते आ.देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते आ.प्रवीण दरेकर, आ.रवींद्र चव्हाण, तालुका अध्यक्ष प्रसन्ना पालांडे, सर्व नेतेगण, भाजपाचे पदाधिकारी आणि सरकारी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस निलेश तांबे, तहसिलदार दिप्ती देसाई, महावितरणचे सूद, राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाच्या डीव्हीजनल इंजिनियर आकांक्षा मेश्राम, तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ, नायब तहसिलदार शरद आठमुठे, निवडणूक नायब तहसिलदार समीर देसाई, एपीआय प्रशांत जाधव तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ.फडणवीस यांनी निसर्ग वादळा-तील बाधितांना आतापर्यंत किती मदत वाटप झाले, अशी विचारणा करताच प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी सुमारे ९० टक्के मदतीचे वाटप झाल्याची माहिती दिली. यावेळी तहसिलदार दिप्ती देसाई यांनी ज्यांची पासबुक अकाऊंट नंबर प्राप्त झाले नाहीत अशांच्या बँकखात्यामध्ये मदतीची रक्कम जमा झाली नसल्याची माहिती यावेळी दिली. याप्रसंगी चौपदरीकरणासाठी संपादित जमिनीवरील ताबा न सोडल्याने सर्व्हिसरोडचे काम सुरू झाले नसल्याबद्दल एका अज्ञात कोट्यधीश व्यक्तीच्या भूमिकेबाबत विरोधीपक्षनेते आ.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे काही पदाधिकाऱ्यांनी माहिती दिली असता संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करण्याची भूमिका यावेळी आ.फडणवीस यांनी स्पष्ट केली. यावेळी कोरोना लॉकडाऊनमुळे अडचणीत आलेल्या काही उद्योग, सेवा आणि संगणक शिक्षणसंस्थांचे कर्ज अथवा व्याज माफीसंदर्भात निर्णय होण्यासाठी पदाधिकाऱ्यांकडून आ.फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हा सरचिटणीस बिपीनदादा महामूणकर, संदीप ठोंबरे, शहर अध्यक्ष राजा दीक्षित, महिला शहर अध्यक्ष उज्वला तथा माई शेठ, जिल्हा कार्यकारणी सदस्य राजू धुमाळ, तालुका सरचिटणीस पंकज बुटाला, युवा मोर्चा रायगड जिल्हा चिटणीस महेश निकम, भाजयुमो शहरअध्यक्ष जयेश जगताप, विकास लाड, भाई जगताप,नामदेव शिंदे, मनोज मोरे, माजी रायगड जिल्हा परिषद सदस्य अनिल नलावडे, एकनाथ कासुर्डे, माजी नगरसेवक प्रदीप पवार, नितीन बोरकर, संतोष कासार, मंगेश शिंदे व भारतीय जनता पार्टी रायगड जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत तसेच अनू पटेल, कलिका अधिकारी, विजया कासार, जान्हवी तलाठी, माई शिंदे, तनुजा भागवत, अर्चना शेठ व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## पत्रकार नितीन देशमुख यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माणगाव उप जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर दीपक देशमुख आणि पत्रकार नितिन देशमुख यांच्या आई आयुष्याची आठ दशके ज्ञानार्जनासह ज्ञानदानात वेचलेल्या माणगावच्या आदर्श शिक्षिका सरोजिनी रमेश देशमुख यांचे गुरूवार २० मे रोजी वृध्दापकाळाने आपल्या रहात्या घरी निधन झाले.



सरोजिनी देशमुख या पनवेलच्या बापट वाड्यात राहणाऱ्या केशव प्रधान यांच्या कन्या वडील पोलिस अधिकारी होते. प्रधान कुटुंब मोठे होते ४ भाऊ व ४ बहिणी मोठ्या बहिणीचे लग्न झाल्यावर सीनियर ट्रेंड करून अलिबाग तालुक्यात शिक्षिका म्हणून नोकरीला लागल्या. घरची परिस्थिति बेताचीच असल्याने १९६० मध्ये हुंडा नको आणि रजिस्टर लग्न करायचे अशी ठाम मते असलेल्या सेवादलाच्या तालमित तयार झालेल्या माणगाव तालुक्यातील वडघर मुद्रे येथील खोतांचा मुलगा रमेश देशमुख यांच्याशी विवाह झाला. त्यानंतर महाड तालुक्यात पूर्वीच्या लोकल बोर्डाच्या नंतर जिल्हा परिषदेच्या शाळेत नोकरी केली. त्यानंतर माणगावला बदली झाली. माणगावात घर बांधून त्या माणगावच्या रहिवाशी झाल्या. माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत मार्गदर्शन केलेल्या त्यांच्या मुलासह २३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. १९८९ मध्ये मुख्याध्यापिका म्हणून सेवा निवृत्ती घेतली तरी त्यांचे अनेक विद्यार्थी शासकीय नोकरीत, कार्पोरेट कंपनीत आणि राजकारणात वरिष्ठ पदावर कार्यरत आ-हेत. आज ही गुरु पौर्णिमेला बाई कोठे आहेत त्यांना शोधत त्यांना भेटायला येतात. त्यांना १९७६ मध्ये महिला वर्षा निमित्त राज्या पातळीवरील लेखन पुरस्कार आणि १९७७ मध्ये कुलाबा जिल्हा परिषदेने त्यांचा आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरव केला होता.

त्यांच्या पश्चात २ मुलगे एक मुलगी, सुना - जावई आणि ४ नातवंडे आहेत. मोठा मुलगा डॉक्टर दीपक माणगावला तर नितिन पनवेल मध्ये रामप्रहर मध्ये पत्रकार म्हणून कार्यरत आहे. मुलगी शलाका मुंबईत आहे. नातवंडांपैकी मयूरी, अनुराग आर्किटेक, मिहिका केमिकल इंजिनियर तर मानसी वकील आहे.

## रोहा तालुक्यातील एक हजार पेरूची वृक्ष तौक्ते चक्रवादळात जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोकणात झालेल्या तौक्ते चक्रीवादळात कोकणसह रायगड जिल्ह्यात घरांचे अनेकांचे नुकसान होत भात शेती व फळझाडांचे मोठे नुकसान झाले असल्याने येथील बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे मागील वर्षात ३ जूनला भयानक झालेल्या निसर्ग चक्रीवादलाचा तड्याख्यातून शेतकरी सावरतो ना सावरतो तीच परिस्थिती पुन्हा उद्भवल्याने पुन्हा बळीराजाची धास्ती वाढली त्यामुळे शेकऱ्यांची आर्थिक स्थिती ढासळलेली असल्याने चिंता वाढली असल्याचे दिसून येत आहे .



भाजी पाल्याच्या व्यवसायात रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या रोहा तालुक्यातील बाहे गावातील युवा होतकरू प्रगतशील शेतकरी राकेश रमेश जाधव यांनी भात शेती लागवड त्याच बरोबर भाजी पाला लागवड करत उर्वरित एक एकाराच्या आपल्या वडिलापार्जित असलेल्या शेतात एक नवा शेती व्यवसायाला जोड व्यवसाय म्हणून फळबाग म्हणून मे २०२० मध्ये झारखंड येथून जवळपास एक ते दीड लाख रुपये खर्च करून एक हजार पेरू फळाची वृक्ष आणून आपल्या शेतात फळ लागवड केली गेली वर्षभर त्या झाडांची चांगली देखभाल करत जोपासना केली आजच्या घडीला सदरील झाडांवर फुले लागली असता केलेल्या मेहनतीचे फळ मिळेल ही अपेक्षा आता या युवकाला लागली आणि अधिक मेहनत करत त्यांना माती भर शेणखत पाणी घालणे यावर अधिक भर दिले परंतु दोन दिसांपूर्वी भयानक झालेल्या तौक्ते चक्रीवादळ व मुसळधार झालेल्या पावसात ही फळझाडे जमीनदोस्त झाल्याने युवा शेतकरी राकेश जाधव सह या गावातील अधिक नुकसानग्रस्त शेतकरी अधिक चिंताजनक असल्याचे संकेत मिळत असून नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत आहेत तरी याबाबत संबधित अधिकारी वर्गाने याबाबत पाहणी करून लवकरात लवकर नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केली जात आहे.

वातावरण बदलवाचा जास्त फटका मिळतो तो समुद्र किनारपट्टीतील भागाला कोकणाला त्या मानाने शासनाने जास्तीत जास्त नुकसान भरपाई कोकणातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देयाला हवी,, वर्षभरात दोन मोठ्या वादळाचे संघर्ष त्यात कोरोनाचा संकट ला सामना सर्वांना करावे लागले आहे.

## मुरुडमध्ये माकडांचे आगमन ; बागायतदारांसाठी दुष्काळात तेरावा महिना

**दै.रायगड नगरी । मुरुड**

गतवर्षीच्या निसर्गचक्रीवादळाने आधीच हवालदिल झालेल्या मुरुडमधील बागायतदारांवर माकडांच्या टोळीचे नवीन संकट उभे राहिले आहे, मुरुड तालुक्यातील २ हजार ५०३ हेक्टर बागायत क्षेत्रापैकी ७९४ हेक्टर बागायत क्षेत्रातील नारळ, सुपारी, आंबे व इतर उत्पन्न देणारी झाडे भुईसपाट झाली होती, त्यामुळे बागायतदारांचे उत्पन्न साधारण ५० टक्क्यांवर आले होते , त्यातच नुकत्याच झालेल्या तोक्ते चक्रीवादळाने बागायतींमधील नुकसानीत भर पडली आहे, नारळ, सुपारी, आंबे, फणस इत्यादी बरीचशी झाडे जमीनदोस्त झाली आहेत तर काही झाडांवरील सुपारी, नारळ तयार होण्याआधीच गळून गेले आहेत.



मुरुडमधील बागायतदार या संकटाला सामोरे जात असतानाच माकडांचे नवीन संकट उभे राहिले आहे , ह्या माकडांच्या टोळ्या बागेतील आंबे, सुपारी इत्यादी पिकांचे अतोनात नुकसान करीत आहेत. यापूर्वी माकडांचा हैदोस हा फक्त अलिबाग तालुक्यातील रेवदंडा, चौल इत्यादी गावांमध्ये पहावयास मिळत होता परंतु मुरुड परिसरात फणसाड, गारंबी सारखे घनदाट जंगल लागून असल्याने तालुक्यातील बागायतदारांना माकडांचा केव्हाच त्रास नव्हता परंतु आता मुरुड शहरासह तालुक्यातील काही भागात माकडांचे आगमन झाल्याने बागायतदार धास्तावला आहे.

निसर्ग व तोक्ते वादळाने जंगलातील त्यांचे खाद्य कमी झाले अस-ावे म्हणून अन्नाच्या शोधात ते गावातील बागायतीमध्ये येत असावे असा अंदाज आहे, मुरुड तालुका सुपारी संघाचे अध्यक्ष महेश भगत यांनी सांगितले की कृषी खात्यातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून यावर उपाययोजना लवकरच करू असे सांगितले.

## सातव्या वेतन आयोगासाठी 'मजीप्रा' कर्मचारी संघटनांची एकजूट ; मुख्यमंत्र्यांना साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**


महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू व्हावा, यासाठी तब्बल १७ कर्मचारी संघटनांनी अलीकडच्या काळात पहिल्यांदाच वज्रमूठ बांधली आहे. सर्व संघटनांनी एकत्र येत राज्य पातळीवर कृती समिती स्थापन केली. या समितीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना याबाबत निवेदनाद्वारे साकडे घातले आहे.

मजीप्राचे अधिकारी, कर्मचारी कोरोना योद्धे म्हणून काम करीत आ-हेत. जनतेला शुद्ध पाण्याचा पुरवठा करीत आहे. जबाबदारी पार पाडताना, कोरोनाची लागण झाल्याने काही कर्मचारी दिवंगत झाले. या बाबीची जाणीव करून देत सेवानिवृत्त कर्मचारी संघटनांच्या कृती समितीने शासनापुढे काही मागण्या मांडल्या आहेत. सातवा वेतन आयोग लागू होऊन अडीच वर्षाचा कालावधी लोटला. महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखाली राज्यात बहुतांश विभागात कर्मचाऱ्यांना कोरोना काळातही याचा लाभ देण्यात आला. अशावेळी माजीप्राला वंचित का ठेवले असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तात्काळ सातवा वेतन आयोग लागू करावा, सहाव्या वेतन आयोगातील २४ वर्षाची कालबद्ध पदोन्नती आणि सुधारित वाहतूक भत्ता तत्काळ लागू करावा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान, अंशराशीकरण, रजा रोखीकरण, भविष्य निर्वाह निधीचे पैसे तत्काळ द्यावे, मजीप्रातील अभ्रियंत्यांप्रमाणे वर्ग दोन व तीनमधील पदोन्नत्या कराव्या, वेतन आयोगातील थकबाकी द्यावी, कार्यरत कर्मचाऱ्यांना विमा कवच द्यावे आदी विषय मुख्यमंत्र्यांकडे मांडले आहे. मजीप्रातील कार्यरत व सेवातिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतनाची व सेवानिवृत्ती वेतनाची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे. २३ पार्च २०१७ ला यासाठीचे विधेयक पारित करण्यात आले. युती शासनाच्या काळातील हा निर्णय असल्याचे समितीने म्हटले आहे.समितीचे दीपक धोटे, राजाराम विठाळकर, अभिमन्यू डोळसे, गजानन गटलेवार, विश्वास वानखेडे, अशोक अळवनी, बाळकृष्ण यमगर आदीनी या प्रश्नासाठी पुढाकार घेतला आहे. सदरचे निवेदन हे मुख्यमंत्री कार्यालय, सिडको भवन येथे देण्यात आले आहे. सदरचे निवेदन मजीप्राचे चव्हाण, प्रनिआअ, शरद म्हात्रे प्रतिनिधी, डोळसे, विजय कोळी, संजय खोडके, विलास मोरे, जमदडे, सुर्वे, भालचंद्र भोईर, राठोड, गणेश पाटील उपस्थित होते.

## अग्निशमन जवानांनी ४ वेळा विझवूनही चिंचेचे झाड अद्यापही पेटलेलेच

**दै.रायगड नगरी । उरण**

चक्रीवादळ आणि मुसळधार पावसात पेटलेले चिंचेचे झाड सिडकोच्या अग्निशमन दलाने दोन दिवसात चार वेळा विझवले. त्यानंतर अर्धेअधिक तोडल्यावरही चिंचेचे अजब झाड अद्यापही पेटून धुमसतच आहे.या घटनेमुळे नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



उरण तालुक्यातील केगाव -डोंगर आळीतील रस्त्याच्या कडेला असलेल्या एका १०० -१५० वर्षांच्या चिंचेच्या झाडाला सोमवारी तीनवेळा आग लागली होती. तीन्ही वेळा सिडकोचे अग्निशमन दलाचे जवान आणि मोरा सागरी ठाण्याच्या पोलिसांच्या मदतीने आग आटोक्यात आणली होती. मात्र मंगळवारी मध्यरात्री चिंचेच्या झाडाने पुन्हा एकदा बुंध्यापासून शेंड्यापर्यंत पेट घेतला होता. त्यामुळे चौथ्यांदा सिडकोच्या अग्नीशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. रस्त्याच्या कडेलाच असलेले आणि नागरिकांसाठी धोकादायक ठरू लागलेले चिं-चेचे झाड केगाव ग्रामपंचायतीने सिडकोच्या अग्निशमन दलाच्या मदतीने विझवुन मंगळवारी अर्धे अधिक कापूनही काढले आहे. मात्र आजही हे अजब चिंचेचे झाड आगीने धुमसतच आहे. त्यामुळे नागरिकही आश्चर्य चकित झाले आहेत.

## सिडको नागरी आरोग्य केंद्र कधी सुरू करणार? चिंचपाडा परिसरातील ग्रामस्थांचा सवाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडको विकसित करीत असलेल्या चिंचपाडा, करंजाडे, पुष्पक नगर आदी परिसरातील नागरिकांसाठी भूखंड क्रं.१३४ सेक्टर आर-२, आर अॅण्ड आर पॉकेट नं.२ या ठिकाणी नागरी आरोग्य केंद्र उभारण्यात आले असून अद्यापही ते सुरू नसल्याने या वसाहतीत राहणाऱ्या तसेच परिसरातील ग्रामस्थांनी सिडको विरोधात संताप व्यक्त केला आहे.

नागरिकांना चांगल्या सोयी सुविधा देण्यासाठी सिडकोने या ठिकाणी वसाहत निर्माण केली. परंतु सध्याच्या कोरोनाच्या काळात सिडकोने नागरी आरोग्य केंद्र सुरू करणे गरजेचे होते. सदर आरोग्य केंद्र हे २०१८ साली उभारण्यात आले आहे.

परंतु अद्याप येथे कुठल्याही प्रकारची सोयी सुविधा नसून ते कुलूप बंद अवस्थेत आहे. तरी या वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हे नागरी आरोग्य केंद्र लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणी येथील ग्रामस्थ करीत आहेत.

सिडकोला आम्ही भूखंड दिले. परंतु नागरी सोयी सुविधा देण्यास सिडको अपुरे पडत असून अधिकारी बदलतात. तसेच त्यांच्या कामाची पद्धत बदलते व त्याचा नाहक त्रास आम्हा ग्रामस्थांना होतो.

**शशिकांत केणी, चिंचपाडा गाव पंच**

सिडको भूमीपुत्रांना वेठीस धरण्याचे काम करीत आहे. परंतु त्यांनी नागरी सोयी सुविधा न पुरविल्यास आम्ही पुन्हा रस्त्यावर उतरून आंदोलन करू.

**समीर केणी, ग्रामस्थ**

